# अपरिचितांच्या क्रांतिकथा

गोपाळ गोडसे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**अपरिचितांच्या क्रांतिकथा : गोपाळ गोडसे**
**© हिमानी सावरकर**
**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत (कै.) श्री. ग. वा. बेहेरे यांनी अस्मिता प्रकाशनाच्या माध्यमातून सर्वप्रथम हे पुस्तक प्रकाशित करण्याचे साहस दाखवले. त्यांचे पश्चात त्यांचे सुपुत्र श्री. रवी बेहेरे यांनी रविराज प्रकाशनाच्या माध्यमातून या पुस्तकाच्या आवृत्ती काढल्या. गोडसे कुटुंबीय ग. वा. बेहेरे व रवी बेहेरे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

**– हिमानी सावरकर**

---

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
रविराज प्रकाशन, पुणे यांच्या तीन आवृत्त्या प्रकाशित
**रिया प्रकाशन, कोल्हापूर.** प्रथम आवृत्ती सप्टेंबर, २०१२ (२,००० प्रती)

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/–

# अपरिचितांच्या क्रांतिकथा

## *परिचय*

होय! ते वेडे होते. देशप्रेमाने वेडे, लोकप्रेमाने वेडे. परकीय शासनाच्या अस्तित्वामुळे वेडे. स्वातंत्र्याकरिता वेडे. अध्यात्माचे वेडे. मोक्षाचे वेडे. मुक्तीचे वेडे.

कोण्या तत्त्वाचे वेड घेतल्यावाचून लोकविलक्षण कार्य घडत नसते. जिवंत असेपर्यंत त्या कार्याच्या मार्गातील सर्व अपेक्षित आणि अनपेक्षित यातना भोगायच्या आणि देहत्यागाची सिद्धता ठेवायची हा मनाचा चिवटपणा ध्येयाशी एकरूप झाल्यावाचून येत नाही. त्या त्या क्षेत्रातील असेच तत्त्वनिष्ठ लोक इतिहास घडवीत असतात. क्रांतिकारक आपल्या रक्ताने, त्यागाने, प्राणार्पणाने राष्ट्राचा इतिहास घडवितात.

स्वातंत्र्याचा ध्यास दे कुणा कठोर कारावास,
कुणास विरहोच्छ्वास, कुणी हो जननिंदेचा घास।
अंदमानचा वास, कुणाच्या गळ्यांत येई फास
शाईने का लिहिला जाई राष्ट्राचा इतिहास?

विस्मृतीची धूळ साठल्यामुळे आता वाचण्यासही अवघड झालेल्या त्या रक्ताच्या इतिहासाच्या पानांचे दर्शन या ग्रंथांत होईल. प्रत्येक रक्तपातामागे मानवजातीचे प्रेम दिसेल; मानवताद्वेष दिसणार नाही. निरपेक्षता दिसेल; स्वार्थ दिसणार नाही. ईश्वराशी एकरूपता दिसेल; द्वैत दिसणार नाही. संसारी जीवनाच्या किंचित बाहेरची दृष्टी हवी.

यापेक्षा अधिक या अपरिचितांचा परिचय अनावश्यक आहे.

# अनुक्रमणिका


| क्र. | कथेचे नाव | | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | मृगेन्द्राची झेप | .......... | ९ |
| २. | वैष्णव जन तो तेणे कहिये | .......... | २२ |
| ३. | हुतात्मा प्रद्योत | .......... | ४० |
| ४. | देव-भक्त दोन्ही एक | .......... | ४८ |
| ५. | वीरेंद्रकुमार दत्तगुप्त | .......... | ५२ |
| ६. | कुकरीने वचन दे ! | .......... | ५९ |
| ७. | ‘बम’ वाल्याचे जानवे | .......... | ७५ |
| ८. | प्रतिशोध | .......... | ८८ |
| ९. | मुकुंद ! मीही येते ! | .......... | १०३ |
| १०. | इंदुभूषण : एक कोवळे बलिदान | .......... | १३७ |
| ११. | मी बोलणार नाही ! | .......... | १४३ |
| १२. | पांढरा चाफा | .......... | १५० |
| १३. | त्वत्स्थंडिली अतुल धैर्य वरिष्ठ बंधू ! | .......... | १५५ |


✦✦✦

# १

# मृगेन्द्राची झेप

***पेडीनंतर डग्लस आणि बर्ज यांना चिरनिद्रा देऊन मिदनापूरने आणि तेथील क्रांतिकिशोरांनी हिंदुस्थानची अस्मिता जागी ठेवली. सहजसुलभ यौवनभावनांनी किशोरींच्या संगतीत रोमहर्षकता उपभोगण्याच्या ठिकाणी या किशोरांनी प्रणय केला पिस्तुलांशी. सप्तपदी केली फाशीच्या फळीवर!***

''आला; निर्मल आला!'' मृगेन्द्रने इतरांचे लक्ष प्रथम आपल्याकडे खेचले आणि सर्वजण त्याने डोळ्याने संकेत केलेल्या दिशेकडे बघू लागले. पंचेत सरोवराच्या तीरावर बसलेल्या आणि वावरणाऱ्या मंडळींतून मधूनच निर्मल दिसत होता तर मधूनच दृष्टिआड होत होता. पण तो या दिशेनेच येत होता हे स्पष्ट दिसत होते. ब्रिज किशोर चक्रवर्ती, अनाथ बंधु पंजा, संतोष कुमार, रामकृष्ण राय, मृगेन्द्र दत्त ही सर्व मुले त्याची वाट बघत होती.

घोळके आणि तुटक बसलेली माणसे न्याहाळत न्याहाळत निर्मल जीवन घोष आपल्या मित्रांत येऊन मिसळला. त्याने इकडे तिकडे पाहिले होते. आपण सुरक्षिततेने बोलू शकू एवढे अंतर जवळात जवळ बसलेल्या लोकांपासून राखले गेले आहे याचे निरीक्षण केले. काहीशा दबलेल्या स्वरात तो म्हणाला,

''मित्रहो! उद्याला बर्ज स्वत:च खेळणार आहे!''

त्याच्या शब्दांत उत्तेजना होती, आनंदही होता. पण जसे स्वर दबलेले होते तशीच ती उत्तेजना आणि आनंदही दबलेला होता.

''कुठे?'' मृगेन्द्रने विचारले.

''बंदीगृहासमोरील क्रीडांगणांत.''

''सामना निश्चित झाला?''

''झाला. खरे म्हणजे तो आधीच निश्चित झाला होता. पण बर्ज खेळणार की प्रेक्षक म्हणून राहणार हे निश्चित नव्हते.''

''तो खेळणार आहे म्हणतोस?''

''होय! याऊन क्लबच्या कार्यवाहाला आताच भेटून आलो मी! प्रतिस्पर्धी समूहाचा म्हणजे मोहामेडन स्पोर्टिंग क्लबचा एक सदस्यही तेथेच होता तेव्हा!''

मृगेन्द्रचे डोळे चमकले. तो झटकन ब्रिज किशोरकडे वळला, ''टाळी दे ब्रिज!'' तो म्हणाला. ब्रिजने टाळी दिली. ''काय सुचले सांग तरी!'' ब्रिज म्हणाला.

''काम झाले!'' मृगेन्द्र म्हणाला. पुढे तो गप्पच राहिला. त्याच्या डोळ्यासमोर दृश्य दिसू लागले. खेळ चालू होण्याच्या भरांत आहे; प्रेक्षकांचे कुतूहल डोळ्यांत आणि कानांत उतरू लागले आहे; खेळाडू फुटबॉल इकडे तिकडे लाथाडीत आहेत; पंच आपल्या शिट्या सरसावण्याच्या पवित्र्यात आहेत; बर्ज आपले स्थान घेण्यासाठी वाटचाल करीत आहे...! तो पुन्हा भानावर आल्यासारखे बोलला, ''उद्याचा सामना मुस्लिम समूह जिंकणार नाही, टाऊन क्लब जिंकणार नाही! आपण जिंकणार आहोत. निर्मल! दे टाळी!''

निर्मलने टाळी दिली. पण त्याने सावधानतेची सूचना दिली. ''कालच्यासारखे होऊ नये!''

''तसे नाही होणार निर्मल!'' ब्रिज म्हणाला. ''काल नेमका तो फडतूस शिपाई आडवा आला असता. बर्जभोवती केवढे कडे होते काल, बघितलेच आहेस तू. आपल्याला त्याच्या भोवतीचे कडे केव्हा थोडे ढिले होते ते बघायचे होते. आणि उद्याला ती संधी येत आहे. आपल्याला हवी तशी!''

''तुझी योजना तरी सांग, म्हणजे त्याप्रमाणे लगेच सिद्धता ठेवायला.'' अनाथ म्हणाला.

''सांगतो.'' मृगेन्द्र म्हणाला. ''ब्रिज, तू सांग, बर्ज कुणीकडून पटांगणावर येईल ते.''